# <u>प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (लोहमार्ग) न्यायालय, दौंड यांचे न्यायालयात.</u>

<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६० व २६३ प्रमाणे समरी फौजदारी खटल्याचे विवरण</u>

**सं.फौ.ख.क्र. २४८४/२०१७.**
**निशाणी –**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | गुन्हा घडल्याची तारीख | – | ०१/०७/२०१७. |
| ०२. | फिर्याद दाखल तारीख | – | ०१/०७/२०१७. |
| ०३. | फिर्यादीचे नांव | – | श्री. शशिकांत गुरव, आर.पी.एफ. सोलापूर. |
| ०४. | आरोपीचे नांव | – | विवेक हरश्चिंद्र अवसारे, वय ३६ वर्षे, रा. ३३६,मंगळवार पेठ, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर. |
| ०५. | गुन्हा कलम | – | कलम १४७ रेल्वे अधिनियम कायदा, १९८९ |

**<u>अपराधाचे विवरण –</u>**

दिनांक ०१/०७/२०१७ रोजी ११.१० वाजता तुम्ही सोलापूर रेल्वे स्थानक येथे रेल्वेचे रुळ ओलांडत असताना मिळून आलात व त्यानुसार तुम्ही कलम १४७ रेल्वे अधिनियम कायदा, १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

**<u>– आरोपीचे प्रतिकथन –</u>**

प्र. १ – तुम्हाला दाखल केलेल्या फिर्यादीची नक्कल प्रत मिळाली काय ?
उत्तर – होय.
प्र. २ – तुम्हाला वाचून दाखविलेल्या गुन्हयाचा तपशिल समजला आहे काय ?
उत्तर – होय.
प्र.३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर – नाही, मला गुन्हा कबूल नाही.

.................................

आरोपीची सही                                        समक्ष

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड.

दिनांक – ०१/०७/२०१७.

## फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १

मी शपथपूर्वक कथन करतो ते येणेप्रमाणे.

माझे नांव – सचिनकुमार,
वय – ३२ वर्षे, व्यवसाय – उपनिरीक्षक, आर.पी.एफ. सोलापूर.
राहण्याचे ठिकाण – सोलापूर,

## फिर्यादी पक्षातर्फे सरतपास सरकारी वकील गैरहजर साक्षीदार स्वतः

०१. दिनांक ०१/०७/२०१७ रोजी फिर्यादी, श्री. शशिकांत गुरव, आर.पी.एफ. सोलापूर यांनी फिर्याद दिली की, त्यांची सोलापूर रेल्वे स्थानकावर होती. त्या वेळेस आरोपी हा ११.१० वाजता सोलापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत असतांना त्यांना मिळून आला. त्यानंतर फिर्यादीने त्यास पकडून माझ्याकडे आणले व लेखी फिर्याद दिली. मी फिर्यादीची फिर्याद लिहून घेतली असून त्यावर फिर्यादीची व माझी सही आहे. आता मला ती फिर्याद दाखविली असून, ती तीच आहे. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. सदर फिर्याद निशाणी क्रमांक ३ वर आहे. आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत असताना मिळून आला म्हणून मी आरोपीविरुध्द १४७ रेल्वे अधिनियमानुसार फिर्याद दाखल केली. आरोपी आज आज रोजी न्यायादालनात उपस्थित आहे. त्यास मी ओळखतो.

## उलटतपास आरोपीतर्फे तो स्वतः

०२. नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड.

दिनांक – ०१/०७/२०१७.

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब.**

प्र.क्र. १ – फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला काय ?
उत्तर – होय.

प्र.क्र. २ – श्री. सचिनकुमार, (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक १०/०५/२०१६ रोजी ११.१० वाजता सोलापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत असतांना मिळून आलात, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?
उत्तर – हे खोटे आहे.

प्र.क्र. ३ – सदर साक्षीदार तुमचे विरुध्द का साक्ष देतात ?
उत्तर – मला माहिती नाही.

प्र.क्र. ४ – तुम्हांस स्वतःला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे काय ?
उत्तर – नाही.

प्र.क्र. ५ – तुम्हांस तुमचे बचावाकरीता साक्षीपुरावा द्यावयाचा आहे काय ?
उत्तर – नाही.

प्र.क्र. ६ – सदर खटल्याबाबत तुम्हांस आणखी काही सांगावयाचे आहे काय ?
उत्तर – नाही.

समक्ष

...............................

आरोपीची सही
दिनांक – ०१/०७/२०१७.

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड.

**प्रमाणपत्र**

वरील तपासणी माझ्यासमक्ष ऐकण्यात व घेण्यात आली असून आरोपीने दिलेला जबाब पूर्णपणे व सत्यतेने नोंदला गेला आहे.

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड.

दिनांक – ०१/०७/२०१७.

## मौखिक न्यायनिर्णय

( पारीत दिनांक ० 1 जुलै २०१७.)

०१. आरोपीवर कलम १४७ रेल्वे अधिनियम १९८९ अन्वये आरोप ठेवण्यात आलेला आहे.

०२. फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकीकत येणेप्रमाणे –

दिनांक ०१/०७/२०१७ रोजी आरोपी हा ११.१० वाजता सोलापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत बसलेला, फिर्यादी श्री. शशिकांत गुरव, आर.पी.एफ., सोलापूर यांना मिळून आला.

०३. अपराधाचे विवरण ( निशाणी क्रमांक २) आरोपीस वाचून दाखविले असता, त्याने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

०४. माझ्यासमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणामिमांसहित निष्कर्ष देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| ०१. | दिनांक ०१/०७/२०१७ रोजी ११.१० वाजता आरोपी सोलापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत असतांना मिळून आल्याचे, फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ........ होय |
| ०२. | आदेश काय ? | ...... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

०५. **मुद्दा क्रमांक १ –**

श्री. सचिनकुमार ( फि.सा. १) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक ०१/०७/२०१७ रोजी ११.१० वाजता सोलापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत असताना फिर्यादी श्री. शशिकांत गुरव, यांना मिळून आला व त्यांनी फिर्यादीची लेखी फिर्याद निशाणी क्रमांक ३ वर नोंदवून घेतली. तसेच सदर साक्षीदाराने साक्षीमध्ये पुढे असे सांगितले की, त्यांच्या चौकशीमध्ये आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत असतांना मिळून आल्याचे निष्पन्न झाले म्हणून त्यांनी आरोपीविरुध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली. सदरची बाब आरोपीने नाकारली आहे. परंतु, तो सोलापूर रेल्वे

स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत होता, ही बाब त्याने नाकारलेली नाही. फक्त उलटतपासामध्ये साक्षीदाराची साक्ष नाकारणे यावरुन तो सोलापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत नसल्याचे गृहीत धरता येणार नाही. तसेच चौकशी अधिका–यास आरोपीस खोट्या प्रकरणात गुंतविण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. यावरुन चौकशी अधिका–याची साक्ष विश्वास निर्माण करते. सबब मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, आरोपीने उच्च श्रेणी प्रतिक्षलयामध्ये बसलेला होता, म्हणून मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

०६. **मुद्दा क्रमांक २** –

आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता, त्याने प्रार्थना केली की, तो गरीब असून हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. त्याच्यावर पूर्ण कुटूंबाची जबाबदारी आहे. तसेच तो कुटूंबातील एकटाच कमावता पुरुष आहे. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केलेले नाही. सदरील केसमधील कागदपत्रे त्याने पूर्वी कोणताही गुन्हा केलेला आहे असे सिध्द करीत नाही. गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे. त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझ्या मते आरोपीस दया दाखविणे योग्य होईल. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

आरोपीस, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये, कलम १५५ रेल्वे अधिनिमय १९८९ च्या अपराधाखाली सिध्द दोषी ठरविण्यात येत असून, त्याने सदर अपराधासाठी रु. १,०००/– (अक्षरी रुपये एक हजार फक्त) दंड भरावा. दंड भरण्यास कसूर केल्यास चार दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

सोलापूर येथील दौरा.
दिनांक – ०१/०७/२०१७.

( ओ. शि. पाटील )
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड.

## <u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायानिर्णय फाईल मधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | एस. के. तोरणे, |
| न्यायाधिशांचे नांव | – | ओ. शि. पाटील, न्यायादंडाधिकारी प्रथमवर्ग, लोहमार्ग न्यायालय, दौंड. |
| निकालाची तारीख | – | ०१/०७/२०१७. |
| निकालपत्र सही केल्याची तारीख | – | ०१/०७/२०१७. |
| निकालपत्र अपलोड केल्याची तारीख | – | २७/०९/२०१७. |